| वर्ष - 7 | अंक - 274 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 19 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मानाचा मुजरा!

# आयेगा तो मोदीही!

## »पंतप्रधानांना विश्वास; परदेशांतून जुलै-ऑगस्टमधील आमंत्रणे आल्याचा दावा



**। नवी दिल्ली । महाईन्यूज ।**

**आगामी लोकसभा निवडणुकीत भाजप भरघोस मतांनी तिसऱ्यांदा केंद्रात सत्ता स्थापन करेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. भाजपच्या दोन दिवसीय अधिवेशनातील समारोपाच्या भाषणात पंतप्रधान म्हणाले, की आपल्याला जून, जुलै, ऑगस्ट महिन्यांमध्ये परदेश दौऱ्यासाठी आमंत्रणे आली आहेत. त्यामुळे विदेशी लोकांनाही माहीत आहे की, 'आयेगा तो मोदी ही..!'**

राज्यसभेत विरोधी पक्षनेते व काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी अनावधानाने केलेल्या टिप्पणीचा पुन्हा एकदा उल्लेख करताना भाजपला ३७० तर 'एनडीए' ४०० पेक्षा जास्त जागा मिळणार, असा निर्धार पंतप्रधानांनी व्यक्त केला. विरोधी पक्षाचे नेतेही 'चारसो पार'चा नारा देत आहेत. २०१९ मध्ये 'एनडीए'ने ३५० हून अधिक जागा जिंकल्या होत्या, आता यावेळी ४०० हून अधिक जागा जिंकू शकू. हा भाजपचा आतापर्यंतचा सर्वात निर्णायक विजय असेल, असे मोदी म्हणाले. भाजपला लोकसभा निवडणुकीत विजयाची खात्री असली तरी, कार्यकर्त्यांनी पुढील १०० दिवस तनमनाने बुथस्तरावर काम केले पाहिजे. १८ वर्षे पूर्ण झालेल्या पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या युवकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करा, प्रत्येक लाभार्थी-प्रत्येक समाजापर्यंत पोहोचा, त्यांचा विश्वास मिळवा, अशी सूचना सभागृहात उपस्थित असलेल्या सहा हजारहून अधिक पदाधिकाऱ्यांना पंतप्रधानांनी केली. देशात अद्याप लोकसभा निवडणुका झालेल्या नसताना नोव्हेंबरपासून मला विदेशातून बोलावणे येत आहे. याचा अर्थ २००४च्या लोकसभेत भाजपच सत्ताधारी असेल, असा विश्वास विदेशातील मंडळींना आधीपासूनच वाटू लागला होता, असे मोदी म्हणाले. केंद्रातील ही सत्ता मला उपभोग घेण्यासाठी नको, तर मला देशासाठी काम करायचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला तेव्हा सत्ता मिळालीच आहे तर त्याचा आनंद लुटूया असे त्यांनी कधी म्हटले नाही. शिवरायांनी रयतेच्या कल्याणाचे लक्ष्य चालूच ठेवले. मीही सुखांचा उपभोग घेणारी व्यक्ती नाही. माझ्या विकासाला नव्हे तर, देशाच्या विकासाला मी प्राधान्य देतो. मी फक्त माझ्या घराचा विचार केला असता तर, कोट्यवधी लोकांसाठी घरे बांधणे मला शक्य झाले नसते, असे मोदी म्हणाले.

राजकारण (राजनीती) नव्हे तर, राष्ट्रीय धोरणासाठी (राष्ट्रनिती) मी काम करत आहे. एका ज्येष्ठ नेत्याने मला सांगितले होते की मी पंतप्रधान आणि मुख्यमंत्री म्हणून पुरेसे काम केले आहे. आता मी विश्रांती घ्यावी. पण, मी 'राजनीती' करत नाही तर, 'राष्ट्रनिती'साठी कार्यरत राहिलो आहे, असे सांगत मोदींनी विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्याचे ध्येय 'भारत मंडपम'मधील भाजपच्या कार्यकर्त्यांसमोर ठेवले. काँग्रेसच्या काळात विकास खुंटल्याची टीका पंतप्रधानांनी यावेळी केली. संरक्षण दलांचे मानसिक खच्चीकरण हे काँग्रेसचे सर्वात मोठे पाप आहे. काँग्रेसने राष्ट्रीय सुरक्षा आणि लष्करी ताकदीला दुय्यम मानल्याने देशाचे नुकसान झाले असा आरोपही त्यांनी केला.

### 'महाभारता'सारखी स्थिती: शहा

» कार्यकर्त्यांना संबोधित करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आजच्या राजकारणाची तुलना 'महाभारता'शी केली. महाभारतात ज्याप्रमाणे कौरव आणि पांडवांचे दोन गट होते, तसेच आताही 'इंडिया आघाडी' आणि 'रालोआ' हे दोन गट आहेत. रालोआमधील पक्ष राष्ट्राच्या हिताचे काम करत असताना विरोधी आघाडीतील सर्व पक्षांमध्ये केवळ घराणेशाही, भ्रष्टाचार आणि लांगुलचालन यालाच महत्त्व दिले जात असल्याचा आरोप शहा यांनी केला. पंतप्रधान मोदी यांना तिसऱ्यांदा निवडून देण्याचे देशाच्या जनतेने निश्चित केले आहे, असा दावाही त्यांनी केला.

### 'पुढील पाच वर्षे महत्त्वाची'

»'विकसित भारत बनवायचा असेल तर देशासाठी पुढील पाच वर्षे महत्त्वाची आहेत. या काळात अधिक वेगाने विकासाची कामे केली जातील. 'रालोआ सरकारच्या गेल्या दहा वर्षांच्या काळात विकासाला प्रचंड गती देण्यात आली. विकसित भारताकडे झेप घ्यायची असेल तर केंद्रात भाजपची सत्ता असणे गरजेचे आहे. 'प्रचंड बहुमताने भाजपला विजयी करा, असे आवाहन मोदींनी केले. युवा, महिला, गरीब आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी राबवलेल्या कल्याणकारी योजनांचा आढावा त्यांनी आपल्या भाषणात घेतला.

---

# सजला 'दिवान-ए-आम', आग्रा येथे आज जल्लोषात शिवजन्मोत्सव!

## » जगभरातील शिवभक्तांचा सहभाग, शिवरायांच्या शौर्यगाथेच्या इतिहासाला उजाळा मिळणार

**। आग्रा ।**

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती उत्सव सोहळ्यासाठी संपूर्ण आग्रा शहर सजले आहे. शहरातील लाल किल्ल्यातील 'दिवान-ए-आम'मध्ये सोमवारी शिवजन्मोत्सव सोहळा साजरा होत आहे. सोहळ्यासाठी भव्य व्यासपीठ, आकर्षक देखावे उभारले जात असून छत्रपती शिवरायांच्या शौर्यगाथेच्या इतिहासाला पुन्हा एकदा उजाळा मिळणार आहे.**



देशाच्या इतिहासात आग्रा येथील लाल किल्ल्याचे मोठे महत्त्व आहे. छत्रपती शिवाजी महाराज लाल किल्ल्यातून मुगल सम्राट औरंगजेबाच्या हातावर तुरी देऊन सुखरूप परतले होते. अनेक वर्षे हा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात होता. त्यामुळे लाल किल्ल्यात शिवजयंती साजरी करण्यासाठी अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनोद पाटील यांनी पुरातत्व खात्याकडे परवानगी मागितली होती. मात्र, सोहळ्याला परवानगी नाकारल्यामुळे त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यक्रमाची तयारी सुरू झाली. राज्य सरकार सोहळ्यासाठी सहआयोजकपद स्वीकारण्यास तयार झाले. लाल किल्ल्यातील शिवजयंती सोहळ्याचे हे दुसरे वर्ष असून, सोमवारी होणाऱ्या सोहळ्यासाठीची तयारी पूर्ण झाली आहे. शिवजयंतीच्या निमित्ताने शहरभर फलक लावण्यात आले आहेत.

### सोहळ्याचे थेट प्रसारण

»सोशल मीडियाच्या माध्यमातून हा कार्यक्रम थेट प्रसारित करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे देशासह जगभरातील कोट्यवधी शिवभक्तांसाठी हा शिवजन्मोत्सव सोहळा एक पर्वणीच असेल. दोन कोटी शिवभक्त ऑनलाइन पद्धतीने हा सोहळा पाहतील असे सांगण्यात आले.

### सोहळ्याचे थेट प्रसारण

»सोशल मीडियाच्या माध्यमातून हा कार्यक्रम थेट प्रसारित करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे देशासह जगभरातील कोट्यवधी शिवभक्तांसाठी हा शिवजन्मोत्सव सोहळा एक पर्वणीच असेल. दोन कोटी शिवभक्त ऑनलाइन पद्धतीने हा सोहळा पाहतील असे सांगण्यात आले.

लाल किल्ल्यातील 'दिवान-ए-आम'मध्ये भव्य व्यासपीठ उभारण्यात आले आहे. या ठिकाणी संगीत सोहळा, शिवजन्म पाळणा, लेझर शोच्या माध्यमातून आग्र्याच्या सुटकेचा इतिहास, पारंपरिक कला प्रदर्शन, शिवजयंती सोहळा तसेच इतर भव्य कार्यक्रम लाल किल्ल्यावर पार पडणार आहेत.

# पुणे विमानतळाच्या नवीन टर्मिनलचं उद्घाटन का नाही?

## काम पूर्ण होऊन पाच महिन्यांरपेक्षा अधिक काळ

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विमानतळाच्या नवीन टर्मिनलच्या उद्घाटनाला मंत्र्यांची वेळ मिळत नसल्याने ते प्रवाशांसाठी खुले झाले नाही, अशी टीका ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केली. केंद्र सरकारला पुण्यासाठी वेळ नसल्याचा टोलाही त्यांनी लगावला. नवीन टर्मिनलच्या उद्घाटनाला होत असलेल्या विलंबाचा मुद्दा आदित्य ठाकरे यांनी समाज माध्यमावर उपस्थित केला.**



ते म्हणाले की, पुणे विमानतळावरील नवीन टर्मिनलचे काम पूर्ण होऊन पाच महिन्यांरपेक्षा अधिक काळ उलटला आहे. एखाद्या मंत्र्याच्या हस्ते उद्घाटन करण्यासाठी त्याला विलंब होत आहे. त्यामुळे प्रवाशांसाठी ते खुले करण्यात आलेले नाही. रंगकाम आणि सीसीटीव्ही बसविणे यासारखी किरकोळ कामे अपूर्ण ठेवण्याची ही सरकारी यंत्रणांची खेळी आहे. यामुळे सरकारच्या सोयीनुसार उद्घाटनाचा निर्णय घेता येतो. नवीन टर्मिनल कधी सुरू होणार, असा प्रश्न खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी विचारला होता. त्यावर सरकारी यंत्रणांनी सीसीटीव्ही कार्यान्वित न झाल्याचे कारण दिले होते. हे उत्तर काही आठवड्यांपूर्वी मिळाले होते. आता टर्मिनल सुरू न करण्यासाठी भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडे कोणते कारण आहे. आधीच्या सरकारने नियोजन केलेल्या आणि केंद्र सरकारने रद्द केलेल्या नवीन विमानतळाबद्दल पुणेकर प्रश्न विचारत नाहीत, तर ते सध्याच्या विमानतळावरील नवीन टर्मिनल कधी सुरू करणार याची विचारणा करीत आहेत, असे ठाकरे यांनी सांगितले.पुणे विमानतळावरील नवीन एकात्मिक टर्मिनलचे काम पूर्ण झाले आहे. हे टर्मिनल पूर्णपणे वातानुकूलित आहे. त्यात प्रवाशांसाठी पाच पादचारी पूल असून, याचबरोबर ३४ चेक-इन काउंटर असतील. तसेच, बॅगांसाठी इन-लाइन बॅगेज हँडलिंग सिस्टिम असेल. या टर्मिनलमध्ये २७ हजार चौरस फुटांमध्ये पादचारी उड्डाणपूल आणि विक्री केंद्रांसोबत प्रवाशांसाठी सर्व अत्याधुनिक सुविधा आहेत. नवीन टर्मिनलसाठी एकूण ४७५ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री जोतिरादित्य शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी टर्मिनलची पाहणी केली होती. नवीन टर्मिनल सुरू झाल्यानंतर जुन्या इमारतीचे नूतनीकरण केले जाणार आहे.रंगकाम आणि सीसीटीव्ही बसविणे यासारखी किरकोळ कामे अपूर्ण ठेवण्याची ही सरकारी यंत्रणांची खेळी आहे. यामुळे सरकारच्या सोयीनुसार उद्घाटनाचा निर्णय घेता येतो.नवीन टर्मिनल कधी सुरू होणार, असा प्रश्न खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी विचारला होता. त्यावर सरकारी यंत्रणांनी सीसीटीव्ही कार्यान्वित न झाल्याचे कारण दिले होते.

# कांदा निर्यातीला केंद्राची परवानगी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवरील बंदी उठविण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्यातील नेत्यांनी दिली आहे. अद्याप केंद्राने याबाबत अधिकृत घोषणा केलेली नाही. पहिल्या टप्प्यात तीन लाख टन निर्यातीला परवानगी देण्यात आल्याची माहिती आहे. याचा फायदा पुणे-नगर-नाशिक पट्ट्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना होणार आहे.रविवारी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्री समितीच्या बैठकीत कांदा निर्यातबंदी सशर्त उठविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही निर्यात सरकारी यंत्रणेमार्फत होणार की खासगी व्यापाऱ्यांकडून होणार, याबाबत अद्याप संदिग्धता आहे. मुख्यमंत्री शिंदे तसेच महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी या माहितीला दुजोरा दिला आहे. केंद्राने अधिकृतरित्या निर्णय जाहीर केल्यानंतर त्याबाबत पुरेशी स्पष्टता येऊ शकेल. महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये पुरेसा कांदा आहे. कांद्याचे दरही पडले आहेत. शेतकऱ्यांकडून सतत निर्यात बंदी उठविण्याची मागणी होत होती. उन्हाळ कांदाही लवकरच बाजारात येणार आहे, या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील बाजार समित्यांमध्ये पंधरा मार्चनंतर उन्हाळ कांदा (गारवा) बाजारात येण्यास सुरुवात होईल. त्यामुळे केंद्राच्या या निर्णयाचा फायदा उन्हाळ कांद्याला होणार आहे. तीन लाख टनांपैकी ५० हजार टन कांद्याची निर्यात बांगलादेशला होणार आहे.'उत्पादनात घट येण्याच्या अंदाज आणि दरातील वाढीमुळे केंद्राने १९ ऑगस्ट २०२३मध्ये कांदा निर्यातीवर बंदी घातली. 'शेतकऱ्यांकडून आक्रमक आंदोलन झाल्यानंतर २८ ऑक्टोबर रोजी प्रति टन ८०० डॉलर हे किमान निर्यात मूल्य निश्चित करण्यात आले.

'त्यानंतरही निर्यात सुरू राहिल्याने ७ डिसेंबर रोजी ३१ मार्च २०२४पर्यंत कांदा निर्यातीवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली.

'निर्बंधापूर्वी दिवाळी अगोदर कांद्याचे दर प्रति क्विंटल सहा हजार रुपयांवर गेले होते. निर्यातबंदीमुळे ते ८०० रुपयांपर्यंत खाली आले.

# शिवजयंती सोहळ्यासाठी शिवनेरी सज्ज, मंत्र्यांच्या आगमनानंतरही शिवभक्तांना गडावर प्रवेश मिळणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

शिवनेरीवर विविध मान्यवर व मंत्र्यांच्या आगमनानंतर सर्वसामान्य शिवभक्तांना गडावरील प्रवेश बंद करून अनेक तास थोपविण्याचा प्रकार यंदा मोडीत निघणार आहे. शिवजन्मस्थळाच्या उत्तरेला अभिवादन सभेचा मंडप उभारण्यात आला असून, त्यामुळे सभा सुरू असताना शिवजन्मस्थळी सामान्य शिवभक्तांच्या येण्यास फारसे निर्बंध राहणार नाहीत. पोलिस आणि महसूल प्रशासनाने प्रथमच शिवनेरीवरील अभिवादन सभेचे ठिकाण बदलल्याने सर्वसामान्य शिवभक्तांमधून समाधान व्यक्त होत आहे. दरम्यान, शिवजन्मोत्सव सोहळ्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत. गडावरील शिवजन्मोत्सव सोहळ्याचा कार्यक्रम मराठा सेवा संघाच्या वतीने होणार असून, शासकीय मानवंदना, मर्दानी खेळ; तसेच शिवचरित्रावरील प्रबोधनात्मक पोवाड्याचे सादरीकरण शाहीर राजेंद्र सानप करणार असल्याची माहिती मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष गणेश महाबरे यांनी दिली.

### 28 ठिकाणी पार्किंगची सुविधा

शिवनेरीवर येणाऱ्या भाविकांच्या वाहनांच्या पार्किंगसाठी जुन्नर शहरात २८ ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. शिवभक्तांची याच ठिकाणी आपली वाहने लावावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बावीसाव्या मायक्रोबायोलीम्पियाड स्पर्ध्येत मएसो आबासाहेब गरवारे महाविद्यालयास प्रथम पारितोषिक

## स्पर्धेत 100 महाविद्यालांतील सुमारे 4 हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शासकीय विज्ञान संस्था, संभाजीनगर येथे १० फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित, राष्ट्रीय स्तरावरील बावीसाव्या मायक्रोबायोलीम्पियाड प्रश्नमंजुषा स्पर्धेत मएसो आबासाहेब गरवारे महाविद्यालयास प्रथम पारितोषिक मिळाले.**



मएसो आबासाहेब गरवारे महाविद्यालय (स्वायत्त), पुणे येथील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील प्रथमवर्षाचे विद्यार्थी पृथा मोघे, महिका खारकर, अनिष दिवेकर यांनी सांघिक प्रथम क्रमांक (सुवर्ण पदक) पटकावला. तसेच मायक्रोपोडीयम स्पर्धेत पृथा मोघे तर मायक्रोबायो कॅनवास स्पर्धेत द्वितीय वर्ष विद्यार्थी सिद्धी ओतारी यांना अनुक्रमे दहावा व पाचवा क्रमांक प्राप्त झाला. सदर स्पर्धेत देशभरातील शंभर महाविद्यालांतील सुमारे चार हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

यशस्वी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. विलास उगले, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. राजन वाल्हे, सहायक प्राध्यापक विशाल लांडगे, वेदांती सातोनकर आणि विभागातील अध्यापक वर्गाचे मार्गदर्शन लाभले.

# महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो' ला विद्यार्थी, उद्योजकांनी भेट द्यावी!

## उद्योगमंत्री उदय सामंत यांचे आवाहन

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संरक्षण उत्पादन क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना सक्षम करणाऱ्या देशातील सर्वात मोठ्या आणि महाराष्ट्रातील अशा प्रकारच्या पहिल्या 'महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो' ला महाविद्यालयीन विद्यार्थी, उद्योजक आणि नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केले.**



इंटरनॅशनल एक्झिबिशन ॲण्ड कन्व्हेनशन सेंटर, मोशी येथे 'महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो'च्या पूर्वतयारीची श्री. सामंत यांनी पहाणी केली. यावेळी आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पीएमआरडीएचे आयुक्त राहुल महिवाल, गणेश निबे, किशोर धारिया, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य अभियंता प्रकाश चव्हाण, नितीन वानखेडे आदी उपस्थित होते.

श्री. सामंत म्हणाले, मोशी येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि कन्व्हेन्शन सेंटर येथे 24 फेब्रुवारी पासून सुरू होणाऱ्या या प्रदर्शनात भारतीय नौसेना, लष्कर आणि वायुसेना या तिन्ही सुरक्षा दलांचा महत्वाचा सहभाग आहे. प्रदर्शनातील विविध सत्रात भारताची संरक्षण सिद्धता, विविध शस्त्रास्त्रांची निर्मिती, संरक्षण क्षेत्रातील संधी याविषयी विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती मिळणार आहे. शालेय विद्यार्थ्यांना शस्त्रास्त्रांविषयी कुतूहल असते. त्यांना आधुनिक शास्त्रासोबत संरक्षण साहित्य जवळून पाहण्याची ही संधी आहे.

संरक्षण अभियांत्रिकी उद्योगांनाही प्रदर्शनात सहभागी करून घेण्यात येणार आहे. या क्षेत्राशी संबंधित स्टार्ट अप्स आणि इतर उद्योगांना उद्योग विस्तार आणि या क्षेत्रातील संधीविषयी प्रदर्शनातून माहिती मिळणार असल्याने उद्योग क्षेत्राशी निगडित प्रतिनिधींनी प्रदर्शनात सहभागी व्हावे, असे आवाहनही श्री.सामंत यांनी केले.



### नवउद्योजकांना नि:शुल्क दालन उपलब्ध करून द्यावे

प्रदर्शनात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या एमएसएमईना निःशुल्क दालन उपलब्ध करून द्यावे. सर्व उद्योग संघटनांच्या बैठका घेऊन त्यांना आमंत्रित करावे, असे निर्देशही त्यांनी दिले. प्रदर्शनातील चार दालनांना शिवनेरी, सिंधुदुर्ग, रायगड आणि पन्हाळा असे नाव देण्यात येणार आहे. संपूर्ण परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांच्या संरक्षण सिद्धतेची संकल्पना प्रदर्शित करण्यात येणार आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयातील 1 लाखाहून अधिक विद्यार्थी या प्रदर्शनाला भेट देणार आहेत. त्यांना 1 हजार प्रकारचे तंत्रज्ञान पाहण्यासोबत भारतीय सुरक्षा दलाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन मिळणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

---

# निगडी येथे शिवसह्याद्री" भव्य महानाट्य उत्साहात!

## महानगरपालिकेच्यावतीने भक्ती-शक्ती येथे 400 कलाकार, घोडे, उंट यांचा समावेश

।पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने भक्ती-शक्ती निगडी येथे शिवसह्याद्री शिवस्पर्श प्रतिष्ठान ग्रुप तळेगाव दाभाडे निर्मित छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित ४०० कलाकार, घोडे, उंट यांचा समावेश असलेले ३ मजली सेटवरील "शिवसह्याद्री" हे भव्य महानाट्य संपन्न झाले. या महानाट्याला नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद दर्शवला. ३ तासांपेक्षा जास्त काळ चाललेल्या या महानाट्यातील कलाकारांचा अभिनय, भव्यदिव्य सेट, आकर्षक अशी विद्युत रोषणाई, पाहून उपस्थित नागरिक मंत्रमुग्ध झालेले पाहायला मिळाले.**



या महानाट्यास उप आयुक्त मिनीनाथ दंडवते, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, माजी नगरसदस्य सचिन चिखले, भक्ती शक्ती शिवजयंती उत्सव समितीचे पदाधिकारी तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उप आयुक्त मिनीनाथ दंडवते यांनी उपस्थितांचे आभार मानले तर सुत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले. संभाजीनगर, चिंचवड येथील कार्यक्रमात "छत्रपती शिवाजी महाराज व आजची पिढी" या विषयावर व्याख्याते संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी प्रविणदादा गायकवाड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी ते म्हणाले, एक उत्कृष्ट प्रशासक, लोककल्याणकारी राजा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांची ओळख होती. त्यांच्या अंगी औदार्य, लोकसंग्रह, नि:पक्षपातीपणा, मित्रभाव, उद्यमशिलता, कल्पकता, तेजस्विता, मातृपितृभक्ती असे अनेक अलौकिक गुण होते. त्यांच्या या गुणांचे तरूण पिढीने अवलोकन करून चांगले समाजकार्य घडविण्याचा निर्धार करायला हवा. या कार्यक्रमास माजी महापौर मंगला कदम, मुख्य लिपीक वसिम कुरेशी उपस्थित होते.

लोकमतचे राज्य संपादक संजय आवटे यांचे संभाजीनगर, चिंचवड येथे 'असे' होते छत्रपती शिवाजी महाराज" या विषयावरील व्याख्यान संपन्न झाले. यावेळी बोलताना ते म्हणाले, आपल्या देशात अनेक राजे होऊन गेले. परंतु त्यांच्या जयंत्या देशभर व देशाबाहेर साजऱ्या होत नाहीत. छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव असे राजे होते ज्यांनी रयतेचे स्वराज्य स्थापन केले. छत्रपती शिवराय सर्वसमावेशक दुरदृष्टी असलेले रयतेच्या कल्याणाचा ध्यास असणारे, न्यायप्रविष्ट शिस्तप्रिय राहून स्वराज्य टिकवणारे राजे होते. छत्रपती शिवराय खऱ्या अर्थाने आरमाराचे जनक होते.

छत्रपती शिवरायांच्या खऱ्या गुरू राष्ट्रमाता जिजाऊ होत्या. कमी सैन्यामध्ये बलाढ्य निजामांना शह देऊन किल्ले ताब्यात घेताना शक्तीबरोबर युक्तीचाही वापर छत्रपती शिवरायांना केलेला दिसून येतो. सूत्रसंचालन रमेश भोसले यांनी केले. १७ फेब्रुवारी रोजी डांगे चौक, थेरगाव येथे शिवशाहीर सुरेश सुर्यवंशी यांचा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित शाहिरी कार्यक्रम पार पडला.

### जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थिती दर्शवावी

दरम्यान, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्वाच्या निमित्ताने 'शिवसह्याद्री' या महानाट्याचे भक्ती- शक्ती निगडी येथे सलग तीन दिवस आयोजन करण्यात आले आहे. तरी नागरिकांनी या महानाट्याला जास्तीत जास्त उपस्थिती दर्शवावी व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रत्यक्ष अनुभवावा, असे आवाहन उप आयुक्त मिनीनाथ दंडवते यांनी केले आहे.

# यशवंत कीर्तिवंत ! वरदवंत सामर्थ्यवंत ! पुण्यवंत नितीवंत ! जाणता राजा!



शिवजयंती विशेष
निलेश दुटाळ
+91 87668 40811

**शिवाजी शहाजी भोसले म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म 19 फेब्रुवारी 1630 रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. याला आता शेकडो वर्ष उलटून देखील छत्रपतींचा इतिहास आजरामर आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे रयतेचा राजा आहे. शिवरायांनी आदिलशाही निजामशाहीतून स्वतःचे स्वतंत्र राज्य निर्माण करून शून्यातून मराठा साम्राज्याची स्थापना केली.**

केवळ 50 वर्षांचे आयुष्य लाभले तरी शेकडो वर्षांचा इतिहास घडविणारे शतकोनशतके लोकांच्या मनात अधिराज्य निर्माण करणारे राजे राहिले आहेत. आणि भविष्यात देखील राहतील हे काय नव्याने सांगावे लागणार नाही. आणि त्यामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशाचे आराध्य दैवत म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज आहेत. आणि राहतीलच यात काही शंकाच नाही.शिवरायांचा इतिहास फक्त ढाल तलवारी आणि लढायांचा नाही, तर घनघोर संघर्षाचा, अन्यायावर मात करण्याचा, धर्म निरपेक्षतेचा, रयतेच्या राज्याचा , सामाजिक न्यायव्यवस्थेचा आहे. छत्रपतींच्या राज्यकारभारांमध्ये राजाची राजसत्ता असताना देखील लोकशाही होती आणि खऱ्या अर्थाने लोकशाहीला शिवरायांनी सुरुवात केली असे म्हणावे लागेल .कोणताही न्यायनिवाडा स्वतः एकट्या राजाच्या विचाराने केला नाही किंवा साम्राज्याचा स्वतःच्या एकट्याच्या किंवा स्वतःच्या कुटुंबाच्या फायद्यासाठी केला नाही, तर रयतेच्या फायद्यासाठी केला. शिवरायांच्या काळात राजाच्या हाती सत्ता साम्राज असतानादेखील कधी राजेशाही किंवा हुकुमशाही पद्धतीने राज्य केले नाही. परंतु सध्या या उलट परिस्थिती आहे. देशात लोकशाही असताना देखील जनतेला विचारात



घेतले जात नाही याची खंत वाटत आहे. शिवरायांनी रयतेचा तसेच शेतकऱ्यांच्या हिताचा विचार केला जमिनी नसणाऱ्या शेतकऱ्यांना जमिनी दिल्या.शेतकऱ्यांचा शेतसारा माफ केला.रयत सुखी तर राजा सुखी हे शिवरायांना ठावूक होते. परंतु आज राजकारणी लोकांकडून शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावल्या जात आहेत.आधूनिकीकरणाच्या नावाखाली शेती काढून घेतली जात आहे. गतवर्षी शेतकऱ्यांना स्वतःच्या हक्कासाठी जवळ जवळ एक वर्ष आंदोलन करावे लागले आणि यावर्षी आत्तादेखील आंदोलन करावे लागत आहे, यासारखे दुर्दैव नाही. शिवरायांच्या पत्रातून रयतेच्या हिताबाबतचे अनेक दाखले सापडले आहेत. त्यातील एक म्हणजे "स्वराज्यातील आंबे फणस आदिकरून हेही लकडे आरमाराचे प्रयोजनची. परंतु त्यांस हात लावू.न द्यावा. काये म्हणोन की ही झाडे वर्षा दो वर्षांनी होतात एसे नाही. रयतेने ही झाडे लावून लेकरांसारखी बहुतकाळ जतन करून वाढविली. ती झाडे तोडीलियावरी त्यांचे दुःखास पारावर काये? येकास दुःख देऊन जे कार्य करीन म्हणेल ते कार्य करणारा सहित स्वल्प काळेच बुडोन नहीसेच होते."रयतेला दुःख पोहोचवून जे कार्य केले जाईल, त्या कर्यासहित कार्य करणारा माती मोल होईल. त्याचबरोबर शाहिस्तेखान पुण्यात येणार असल्याची बातमी लागताच शिवरायांनी आपल्या लष्कराला शेतकरी तसेच अन्नधान्य सुरक्षित स्थळी पोहोचवण्याचे आदेश दिले होते. भविष्यकाळाचा वेध घेऊन शेतकऱ्यांचे नुकसान होण्याअगोदर शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले आहेत परंतु आज आधुनिक तंत्रज्ञान असतानादेखील शेतकऱ्यांचे नैसर्गिक आपत्तीपासून होणारे नुकसान टाळण्यास सरकार असमर्थ ठरत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज युगपुरुष होते.प्रचंड बौद्धिक क्षमतेच्या जोरावर त्यांनी मराठा साम्राज्य निर्माण केले. कमी सैन्याच्या मदतीने संपूर्ण दक्षिण प्रांत काबीज केला. त्यांनी गुप्तहेर खाते, गनिमी कावा, गडकिल्ल्यांची तटबंदी, नवनवीन गड किल्ले निर्मिती, शिष्टमंडळ, सैनिकांना पगार, वतनदारी पद्धतीचे निर्मूलन, जलदुर्ग निर्मिती, असे नवनवीन प्रयोग यशस्वीपणे राबविले. सागरिमार्गे परकीय आक्रमनांचा धोका तसेच जलवाहतुकीचा फायदा लक्षात घेऊन पोर्तुगिजांकडून नौका बनविण्याचे तंत्र आत्मसात करून स्वतः नौका तयार केल्या. म्हणूनच त्यांना भारतीय नौदलाचे जनक संबोधले जाते. व्यापारासाठी तसेच अन्नधान्य व शस्त्रसाठा वाहतुकीसाठी जलवाहतूकीला कमी खर्च व कमी वेळ लागेल याची कल्पना होती. अलीकडच्या काळात भारतीय नौदलाच्या झेंड्याला अष्टकोनाचे (राजमुद्रा) चिन्ह दिले असले, तरी मुद्रेतील मजकूर मात्र हटविला आहे. असो. शिवाजी महाराजांना संपूर्ण प्रदेशाच्या भूभागाची इत्यंभूत माहिती होती. हे त्यांच्या अनेक मोहिमेतून लक्षात येते. वेळेचे अचूक नियोजन कसे करावे हे त्यांच्याकडून शिकावे. मग शाहिस्तेखानाच्या फाजितीचा भाग असो, सुरत लुटण्याचा प्रसंग असो, आग्र्याहून सुटका असो, अफजल खानाचा वध असो, सर्व पूर्वनियोजित करून त्याचा शेवटही ठरल्याप्रमाणे केला जात असे. गड काबीज केला आहे, हे आपल्या सैनिकांना समजण्यासाठी चालवण्यात येणाऱ्या तोफांचा आवाज किंवा मशाल पेटवून मोठ्या प्रमाणात उजेड पाडला जायचा. खूप दूरपर्यंत शत्रूवर नजर राहावी, यासाठी उंचच्या उंच डोंगराची निवड केली जायची वा व त्याच डोंगराचा पुढे गड केला जायचा. अशा अनेक प्रयत्नांतून आपणाला शिवरायांच्या अपार बुद्धिमत्तेची कल्पना येते. तर अशा शिवरायांच्या पदपर्षाने पावन झालेल्या ,शिवरायांची जन्मभूमी असलेल्या महाराष्ट्रात आपण जन्मलो हेच आपले मोठे भाग्य आहे. फक्त मिरवणुका काढून चालणार नाही, तर शिवरायांचे विचार, शिवरायांचे गुण आत्मसात केले पाहिजेत. त्यातूनच छत्रपती शिवाजी महाराज अस्तित्व युगेन युगे अजरामर राहणार आहे.

जय भवानी, जय जिजाऊ, जय शिवराय!

## संपादकीय »

### मौनाचे मोल!

***सामान्य रशियनांनी पुतिन यांच्या आश्वासनांवर विश्वास ठेवताना विवेकास रजा दिली. त्याची शिक्षा म्हणजे नवाल्नींसारख्यांचे मरण..***

अलेक्झांडर लित्विनेन्को, बोरीस नेम्त्सॉव, बोरीस बेरेझोवस्की, बदारी पतारलत्सिविली, निकोलाय ग्लुश्कॉव, युरी गोलुबेव, सर्जेई युशेन्कोव, नताल्या एस्तिमिरोवा, सर्जेई मॅग्तेस्की, ॲना पोलित्कोवस्काया आणि तिच्यासारखे १५७ पत्रकार, अलीकडे युक्रेनयुद्धात साथ देणारे येव्गेनी प्रिगोझिन, व्लादिमीर कारा-मुर्झा, मिखाईल खोदोर्कोवस्की, बुद्धिबळातील जग्गजेता गॅरी कास्पारॉव इत्यादी किती नावे सांगावीत? हे सारे पुतिनबळी. यातील कारा-मुर्झा तूर्त तुरुंगात आहेत आणि खोदोर्कोवस्की, कास्पारॉव देशत्याग केल्याने जिवंत आहे. यातील काही अब्जाधीश उद्योगपती होते, काही तर पंतप्रधानपदासारख्या महत्त्वाच्या पदांवरील राजकारणी होते, काही वकील तर काही मानवाधिकार कार्यकर्ते! यातील काही घराजवळ, काही तर अगदी क्रेमलिनसमोर, काही परदेशांत गोळ्या घालून तर काही विषबाधेने मारले गेले.

ऐंशी-नव्वदचा काळ हा दूरदर्शनचा ऐन बहराचा काळ. या काळात दूरदर्शन वाहिनीवरील जाहिराती, मालिका, चर्चात्मक वा मुलाखतींचे कार्यक्रम असोत, त्यातील आशय आणि तो प्रेक्षकांपर्यंत उत्तमपणे पोहोचवणारे कलाकार पुढे कितीतरी दशके लोकांच्या मनात घर करून राहिले.

## ऐंशी-नव्वदचा काळ हा दूरदर्शनचा बहराचा काळ

कपडे धुण्याच्या पावडरच्या जाहिरातीतून शुभ्र पांढ्या रंगाची साडी, कपाळावर ठसठशीत कुंकू असा भारतीय स्त्रीचा पारंपरिक साज जपणारी, पण काळानुरूप बदललेली हुशार आई 'ललिताजी' म्हणून लोकप्रिय झालेली अभिनेत्री कविता चौधरी या अशा कलाकारांपैकी एक. त्यांची ललिताजी आणि 'उडान' मालिकेतील पोलीस अधिकारी कल्याणी सिंग या त्या काळात त्यांनी साकारलेल्या खंबीर नायिका ही त्यांची ओळख लोकांच्या मनात आजही घट्ट बसली आहे. त्यामुळे त्यांच्या अकस्मात निधनाचे वृत्त ऐकल्यावर एक गुणी, हुशार अभिनेत्री गमावल्याची हळहळ कित्येक मनांत उमटली. अगदी सुरुवातीला त्यांनी 'अपराधी कौन' नामक एका मालिकेत छोटेखानी भूमिका केली होती.या भूमिकेमुळे मनोरंजन क्षेत्रातील वाटा त्यांच्यासाठी खुल्या झाल्या. पुढे 'ललिताजी' म्हणूनही त्यांना ओळख मिळाली, मिनिटभराच्या जाहिरातीतले



ते पात्र कविता चौधरींमुळे जिवंत झाले, घराघरांत ललिताजींचे 'ए भैया, ठीकसे तोलो' यासारखे वाक्य पोहोचले. मात्र खरी कमाल केली ती त्यांच्या 'उडान' मालिकेने. 'उडान'चे लेखन, दिग्दर्शन आणि अभिनय अशा तिन्ही आघाडया कविता यांनी सांभाळल्या होत्या. एका सामान्य घरातील तरुणीने पोलीस अधिकारी बनण्याचे पाहिलेले स्वप्न, त्यासाठी केलेले प्रयत्न आणि वास्तवात पोलीस अधिकारी म्हणून कामाला सुरुवात केल्यानंतरचा प्रवास असे चित्रण १९८९ ते ९१ दरम्यान प्रसारित झालेल्या या मालिकेत करण्यात आले होते. या मालिकेची कल्पना त्यांच्या बहिणीवरून सुचली होती. कविता यांची बहीण स्वत: पोलीस अधिकारी होत्या. त्यांच्या आयुष्यावरून प्रेरणा घेत केलेली ही मालिका इतकी लोकप्रिय का झाली? याचे उत्तर खुद्द कविता यांच्या भाषेत सांगायचे तर त्यांची मालिका वास्तवावर आधारित आणि प्रामाणिकपणे चित्रित केलेली होती. आत्ता ज्या पद्धतीने पोलिसांचा गणवेश, त्यांच्या गाडया, बंदुका अशा सगळया अभिनिवेशासह रुपेरी पडद्यावर त्यांची भव्यदिव्य प्रतिमा उभी करण्याचा प्रयत्न केला जातो तशा पद्धतीने काम न करताही त्यांची कल्याणी सिंग प्रेक्षकांना ठळकपणे लक्षात राहिली. आजही छोटया पडद्यावर अगदी हाताच्या बोटांवर मोजता येतील इतक्या महिला पोलीस अधिकाऱ्यांच्या भूमिका प्रेक्षकांना पाहायला मिळाल्या आहेत, मात्र कविता चौधरी यांच्याइतकी लोकप्रियता त्यांना लाभलेली नाही. आपल्याला जे योग्य वाटते तेच करायचे या भूमिकेतून त्यांनी कलाप्रांतातील मुशाफिरी केली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥
आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राजकारणासाठी नाते तोडू नये!

## ‘काका-पुतण्या’च्या नात्यावर जयंत पाटलांचं विधान!

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या काही वर्षांत राज्यात काका-पुतण्यांचं राजकारण अवघ्या महाराष्ट्राने पाहिलं. अजित पवारांनी राष्ट्रवादीत बंड केल्यानंतर या काका-पुतण्याच्या राजकारणाची चर्चा चालू झाली. यावरूनच, शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी यावरून टीका केली आहे. आज राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या पुतळ्याच्या अनावरणाच्या कार्यक्रमात बोलत होते.**



एखाद्यावर संताप व्यक्त करण्यासाठी खालच्या दर्जाला राजकारण गेलं आहे. त्यामुळे आता कुठेतरी थांबलेलं बरं असं अनेकांना वाटतं. किती गुंडगिरी महाराष्ट्रातील राजकारणात शिरते आहे, याची अनेक उदाहारणं गेल्या काही महिन्यांत दिसायला लागली आहेत. माझी लातूरकरांना विनंती आहे की, या लातूरने महाराष्ट्रातील काँग्रेसला सतत तेज देण्याचं काम केलं आहे. काँग्रेस महाराष्ट्रात ठामपणे अस्तित्वात आहे, हे अनेकवेळा या लातूरने सिद्ध करून दाखवलं आहे. लातूरकरांवर ही जबाबदारी आहे की आपल्या महाराष्ट्रात ज्या संस्कृतीत वाढलो, जी संस्कृती विलास देशमुखांनी दाखवली, ती संस्कृती लोप पावत आहे. या लोप पावणाऱ्या या संस्कृतीला टिकवण्याचं काम लातूरकरांचं आहे”,असं भावनिक आवाहन जयंत पाटलांनी केलं.“काँग्रेसचं बरं आहे काका-पुतण्याचं नातं धार्जिणं दिसत आहे. दिलीप देशमुख उत्तमपणाने नेतृत्त्व करत आहेत. अमित यांच्यासह सर्वांचे संबंध मधूर आहेत. राजकारणात कसंही कोणी वागलं तरी चालतं. पण राजकारणासाठी व्यक्तिगत नातं तोडण्याची भूमिका कोणी घेता कामा नये. आता त्याही गोष्टी व्हायला लागल्या आहेत”, असा अप्रत्यक्ष टोलाही त्यांनी लगावला.“काँग्रेसमधील दिलीप देशमुखांच्या मागे सक्षम आणि खंबीरपणाने राहणारा नेता अमित देशमुखांच्या रुपाने भेटला आहे. पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, बाळासाहेब थोरात यांच्या पीढीच्या नंतरची पिढी म्हणून सतेज पाटील आहेत”, असंही जयंत पाटील म्हणाले.आज विलासराव देशमुख असते तर काँग्रेस अधिक संपन्न आणि सामर्थ्यवान झाली असती. विलासरावांनी सक्षम आणि भक्कम काँग्रेस महाराष्ट्रात उभी होती. काँग्रेस विलासरावांच्या नेतृत्त्वामुळेच होती. विलासराव देशमुखांना महाराष्ट्रातील खडान् खडा माहिती होती”, असंही ते म्हणाले.“लोक एखाद्या व्यक्तीला त्यांनी केलेल्या चांगल्या कामामुळे स्मरणात ठेवतात. विलासराव देशमुख साहेब यांनी मराठवाड्यासाठी आणि संपूर्ण राज्यासाठी विस्तृत काम केले आहे. आटपाडीच्या साखर कारखान्याच्या उद्घाटनप्रसंगी ते आले होते. तेव्हा त्यांचे भाषण पहिल्यांदा ऐकलं. राजकारण्याने कसे भाषण करावे हे विलासरावांकडून शिकले पाहिजे. मी त्यांच्या मंत्रिमंडळात अधिकतम काम केले आहे. त्यामुळे त्यांचे आणि माझे घनिष्ट ऋणानुबंध होते. त्याकाळी फार वेगळे राजकीय संस्कार आम्ही अनुभवले. म्हणून महाराष्ट्राला विकासाच्या मार्गावर नेऊ शकलो. आज स्व. विलासराव देशमुख साहेब असते तर काँग्रेसच्या संकटाच्या काळात उभे ठाकले असते. काँग्रेस भक्कम पाय रोवून उभी आहे ती विलासराव देशमुख साहेबांमुळे”, असे कौतुकग्दारही त्यांनी उद्गारले.

### काँग्रेस महाराष्ट्रात ठामपणे अस्तित्वात

» एखाद्यावर संताप व्यक्त करण्यासाठी खालच्या दर्जाला राजकारण गेलं आहे. त्यामुळे आता कुठेतरी थांबलेलं बरं असं अनेकांना वाटतं. किती गुंडगिरी महाराष्ट्रातील राजकारणात शिरते आहे, याची अनेक उदाहारणं गेल्या काही महिन्यांत दिसायला लागली आहेत. माझी लातूरकरांना विनंती आहे की, या लातूरने महाराष्ट्रातील काँग्रेसला सतत तेज देण्याचं काम केलं आहे. काँग्रेस महाराष्ट्रात ठामपणे अस्तित्वात आहे, हे अनेकवेळा या लातूरने सिद्ध करून दाखवलं आहे. लातूरकरांवर ही जबाबदारी आहे की आपल्या महाराष्ट्रात ज्या संस्कृतीत वाढलो, जी संस्कृती विलास देशमुखांनी दाखवली, ती संस्कृती लोप पावत आहे. या लोप पावणाऱ्या या संस्कृतीला टिकवण्याचं काम लातूरकरांचं आहे”,असं भावनिक आवाहन जयंत पाटलांनी केलं.“काँग्रेसचं बरं आहे काका-पुतण्याचं नातं धार्जिणं दिसत आहे. दिलीप देशमुख उत्तमपणाने नेतृत्त्व करत आहेत. अमित यांच्यासह सर्वांचे संबंध मधूर आहेत. राजकारणात कसंही कोणी वागलं तरी चालतं. पण राजकारणासाठी व्यक्तिगत नातं तोडण्याची भूमिका कोणी घेता कामा नये. आता त्याही गोष्टी व्हायला लागल्या आहेत”, असा अप्रत्यक्ष टोलाही त्यांनी लगावला.“काँग्रेसमधील दिलीप देशमुखांच्या मागे सक्षम आणि खंबीरपणाने राहणारा नेता अमित देशमुखांच्या रुपाने भेटला आहे. पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, बाळासाहेब थोरात यांच्या पीढीच्या नंतरची पिढी म्हणून सतेज पाटील आहेत.

---

# हिंमत असेल तर मुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्या

## मी तुमच्या मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास तयार : आदित्य

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सर्वेक्षणात आपण पहिल्या क्रमांकावर आहोत. त्यामुळे हे महापालिकांच्या निवडणुका घेण्याची हिंमत दाखवित नाहीत. हिंमत असेल तर मुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्या. मी तुमच्या मतदारसंघातून लढायला तयार आहे असे आव्हान ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले. मला पद नकोय, मी माझ्या महाराष्ट्रासाठी लढतो आहे, असेही ते म्हणाले.**





आदित्य ठाकरे हे रविवारी सायंकाळी शाखा भेटी देण्यासाठी ठाण्यात आले होते.आदित्य ठाकरे म्हणाले, ठाण्यात येतो तेव्हा जुन्या आठवणी येतात. ठाणेकरांनी खूप प्रेम दिलंय, गद्दार गेले पण ठाणे शिवसेनेचे राहिले आहे. सध्या खोटे बोला पण रडून बोला अशी नवी फॅशन झाली. रडायचे आणि जे पाहिजे ते मिळवायचे असे अनेकवेळा मी पाहिले आहे. काल देखील ते रडले. तुम्ही शिवसैनिक म्हणून अपयशी ठरलात. पण माणूस म्हणून पण अपयशी ठरलात असा थेट आरोप त्यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर केला. भाजप आत टाकेल म्हणून २० मे २०२२ ला तुम्ही रडले होते असेही ते म्हणाले. ज्या व्यक्तीने तुम्हाला सर्व दिले. त्या व्यक्तीचे वडिल, पक्ष चोरण्याचा प्रयत्न तुम्ही केला. तुमच्या डोक्यावरचा गद्दारीचा शिक्का पुसला जाणार नाही असेही आदित्य ठाकरे म्हणाले.तुम्हाला जेवढा मोकळा हात दिला. तेवढा कोणाला दिला नव्हता.

### तर तुमचे आमचे काय होणार

» पण तुम्ही विश्वासघात केला. महाराष्ट्रात नवा उद्योग अडीच वर्षात आलेला नाही. रोजगार, नोकऱ्या उपलब्ध नाहीत. महाराष्ट्रातले उद्योग गुजरातला पाठविले आहे. मंत्रालय देखील गुजरातला हलवतील. जाहिरांतीवर खर्च होतो. येथे विकास स्वतःचा, कंत्राटदार यांचा होतो. पण सामान्य नागरिकांचा विकास होत नाही. दुकानदारांकडून वसूली केली जाते. यांच्या गावात जाण्यासाठी रस्ता नाही. पण शेतात दोन हेलिकॉप्टर उतरतात. हे शेतीपण अमावस्या किंवा पौर्णिमेला करतात. जो व्यक्ती स्वतःच्या स्वार्थासाठी खंजीर खूपसू शकतो. उद्धव ठाकरे यांच्यावर दोन शस्त्रक्रिया झाल्या. त्यावेळी ४० गद्दारांना घेऊन दिल्लीसमोर लोटांगण घातले. तर तुमचे आमचे काय होणार, असेही आदित्य ठाकरे म्हणाले.


# काँग्रेसने लष्करावरही आरोप केले

## काँग्रेसचं टेप रेकॉर्ड आपल्याकडे आहे :पंतप्रधान नरेंद्र मोदी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, अजून निवडणुका लागल्या नाहीत. पण मला जगभरातून जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्याची आमंत्रणे आली आहेत. याचा अर्थ जगभरातील विभिन्न देशांनाही भाजपा सरकारवर विश्वास आहे. जगातील प्रत्येक शक्तीला माहित आहे की येणार तर मोदीच.**



"देशाला काँग्रेसपासून वाचवणं, देशातील प्रत्येक नागरिकाला वाचवणं, आपल्या लहान मुलांचं-तरुणांचं भविष्य वाचवणं हे भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्यांचं दायित्त्व आहे", असंही मोदी म्हणाले. ते पुढे म्हणाले, "काँग्रेसचं टेप रेकॉर्ड आपल्याकडे आहे. काँग्रेस अस्थिरताची जननी आहे, काँग्रेस घराणेशाहीची जननी आहे. काँग्रेस भ्रष्टाचाराची जननी आहे. काँग्रेस तुष्टीकरणाचीही जननी आहे.""७० च्या दशकात देशात जेव्हा काँग्रेसविरोधातील वातावरण तयार झालं, तेव्हा स्वतःला वाचवण्यासाठी अस्थिरता निर्माण केली गेली. प्रत्येक नेत्याचं सरकार काँग्रेसने अस्थिर केलं. आजही हे लोक अस्थितरता निर्माण करण्यासाठी षडयंत्र रचत आहेत. त्यांनी निर्माण केलेल्या (इंडिया) आघाडीचीही हीच ओळख आहे. काँग्रेसकडे विकासाचा अजेंडा नाही, भविष्याचा रोडमॅप नाही. भाषा आणि क्षेत्राच्या आधारावर काँग्रेस देशाचं विभाजन करत आहे",अशीही टीका नरेंद्र मोदींनी केली."काँग्रेसचं सर्वांत मोठं पाप देशाच्या लष्कराचं मनोबल तोडण्यासही ते मागे राहिले नाहीत. देशाची राष्ट्रीय सुरक्षा आणि सामरिक शक्तीला नुकसान पोहोचण्यासाठी कोणतीही कसर सोडली नाही. देशाच्या सुरक्षेवर जेव्हा प्रश्नचिन्ह उभे राहिले, आपल्या लष्कराने जेव्हा कोणतं यश संपादन केलं, तेव्हा प्रत्येकवेळी काँग्रेसने त्यांच्यावर प्रश्न उपस्थित केले. तुम्ही फक्त विचार करा की पाच वर्षांपूर्वी काय म्हटलं होतं की, या लोकांनी रायफेलसारखे एअराक्राप्ट न मिळण्यासाठी प्रयत्न केले. सर्जिकल स्ट्राईकवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले. एअर स्ट्राईकच्या वेळी त्यांच्या यशस्वीतेचे प्रमाणपत्र मागितले गेले. काँग्रेस प्रचंड गोंधळलेली आहे", असंही मोदी म्हणाले."काँग्रेसमध्ये वाद सुरू आहेत, मोठा वाद सुरू आहे. योजनांसाठी हा वाद नाहीय. काँग्रेसमध्ये एक वर्ग आहे जो म्हणतो मोदींवर तिखट आरोप करा, व्यक्तिगत आरोप करा. त्यांची प्रतिमा मलिन करण्यासाठी प्रयत्न करा. तर दुसरा वर्गात काँग्रेसचे मूळ परंपरांगत लोक आहेत. ते म्हणतात की काँग्रेसमधील मोदीविरोध बाहेर काढा. यामुळे काँग्रेसला सर्वाधिक फायदा होईल. म्हणजेच, काँग्रेस सैद्धांतिक मुद्द्यावर लढत नाही. काँग्रेस एवढी हताश आहे की त्यांच्यात सैद्धांतिक आणि वैचारिक विरोध करण्यासाठी त्यांच्यात साहस नाही. त्यामुळे शिव्या आणि खोटे आरोप करणे हाच एकमेव त्यांचा अजेंडा आहे", असंही मोदी म्हणाले.मागच्या दहा वर्षांत देशाने गतीने प्रगती केली आहे. हे एकटा मी म्हणत नाही तर सगळं जग गाजावाजा करुन ही बाब सांगते आहे. प्रत्येक क्षेत्रात भारताच्या प्रगतीचा आलेख उंचावला आहे. एक मोठा संकल्प आणि प्रत्येक भारतीय जोडला गेला आहे. त्यामुळे आपला देश छोटी स्वप्न पाहू शकत नाही आणि संकल्पही छोटे करु शकत नाही असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आपल्याला भारत विकसित देश करायचा आहे हे आपलं स्वप्न आहे. यासाठी पुढच्या पाच वर्षांची खूप मोठी भूमिका असणार आहे. पुढच्या पाच वर्षांत आपल्या विकसित भारतासाठी एक प्रचंड हनुमान उडी घ्यायची आहे. आपल्याला जर अशी हनुमान उडी घ्यायची असेल तर सरकारमध्ये भाजपा परत येणं आवश्यक आहे हे विसरु नका असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले आहेत.आज विरोधी पक्षातले नेतेही एनडीए सरकार चारशे पार चे नारे देत आहेत. हे लक्ष्य गाठायाचं असेल तर भाजपाला ३७० जागा जिंकाव्याच लागतील. अनेकदा लोक मला सांगतात तुम्ही इतकं सगळं केलंत आता कशाला धावपळ करता? त्यावर मी सांगतो दहा वर्षात निष्कलंक कार्यकाळ आपण दिला आहे. २५ कोटी लोकांना आम्ही गरिबीतून बाहेर काढलं आहे. आपण आपल्या देशाल्या महाघोटाळ्यांमधून आणि दहशतवादी हल्यांमधून मुक्ती दिली आहे.

### मोदींनी सांगितला तो किस्सा

» आपण गरीब आणि मध्यमवर्गीयांचं आयुष्य यांचा स्तर उंचावून दाखवला आहे. जे म्हणतात हे सगळं खूप झालं त्यांना एक घटना सांगतो.एकदा एक बडे नेते मला भेटले. मला म्हणाले तुम्ही पंतप्रधान झालात ही खूप मोठी गोष्ट आहे. तुम्ही मुख्यमंत्रीही बराच काळ होतात, दुसऱ्यांदा पंतप्रधान झाला. आता तर थोडा आराम करा. असं मला एक बडे नेते म्हणाले होते. त्यांची ती भावना राजकीय अनुभवांतून आली होती. पण आपण राजकारण करत नाही आपण राष्ट्राची सेवा करतो. आपण छत्रपती शिवाजी महाराजांना मानणारे आहोत. छत्रपती शिवराय हे छत्रपती झाले म्हणून त्यांनी आराम केला नाही. त्यांचं त्यांचं राज्य वाढवलं. त्यांचीच प्रेरणा घेऊन मी देखील हेच सांगतो आहे की मी देखील शांत बसणार नाही. राष्ट्राला विकसित राष्ट्र करायचं आहे हा माझा संकल्प आहे. जर मी माझ्या घराची काळजी करत बसलो असतो तर कोट्यवधी लोकांसाठी घरं बांधता आली नसती असंही मोदी यांनी म्हटलं आहे.देशातल्या कोट्यवधी युवकांचं, तरुण तरुणींची स्वप्नं हाच माझा संकल्प आहे. आपण सगळे सेवाभावातून दिवसरात्र एक करुन काम करत आहोत. प्रत्येक भारतीय नागरिकाचं आयुष्य बदलण्यासाठी आपल्याकडे नवे संकल्प आहेत.

# नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान होतील

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची विरोधकांवर कडाडून टीका

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा भारताचे पंतप्रधान होतील असं म्हणत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आणि मागच्या दहा वर्षातल्या त्यांच्या कामगिरीचं कौतुक केलं आहे. मागच्या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात समाजाच्या प्रत्येक वर्गाने विकास साधाल आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदीच पुन्हा पंतप्रधान होतील यात काहीही शंका नाही.**




तसंच दहशतवाद, नक्षलवाद संपवण्यासाठी मोदी सरकारचा तिसरा कार्यकाळ पुरेसा आहे असाही विश्वास अमित शाह यांनी व्यक्त केला. दिल्लीत भाजपाचं राष्ट्रीय अधिवेशन पार पडतं आहे. "मागच्या ७५ वर्षांच्या काळात लोकसभेच्या १७ निवडणुका, २२ सरकारं आणि १५ पंतप्रधान देशाने पाहिले आहेत. देशाचा विकास करण्याचा प्रयत्न त्या त्या सरकारांनी त्यांच्या परिने केला. मात्र आज कुठलाही संभ्रम मनात न ठेवता मी हे आत्मविश्वासाने सांगू इच्छितो आहे की मोदी सरकारच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात प्रत्येक क्षेत्राचा विकास झाला. समाजातल्या शेवटच्या माणसापर्यंत विकास पोहचवण्याचं काम पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विविध योजनांमधून केलं. भाजपा बूथमध्ये काम करणारा व्यक्ती देशाचा राष्ट्रपतीही होऊ शकतो आणि पंतप्रधान होऊ शकतो हे आपण पाहिलं आहे. कारण आपला पक्ष हा लोकशाही मानणारा पक्ष आहे.विरोधी पक्षांवर जोरदार हल्लाबोल करत अमित शाह म्हणाले, "लांगुलचालन करणारे आणि घराणेशाही जपणारे जे पक्ष आहेत त्यांचं नेतृत्व काँग्रेस पक्ष करतो आहे. मात्र भाजपाची प्राथमिकता राष्ट्र प्रथम ही आहे. आपण विकासाचा विचार करतो, मात्र विरोधी पक्षांचा गट असलेली इंडिया आघाडी आणि त्यातले नेते हे आपल्याच मुलांना पंतप्रधान होता येईल का?


### आघाडीकडे पाहिलं तर ती घमंडिया आघाडी

» मुख्यमंत्री कसं होता येईल? यासाठी त्यांचेच चेहरे समोर आणतात. दलित, आदिवासी समाज यांचा वापर इंडिया आघाडीने फक्त व्होट बँक म्हणून केला आहे. मात्र या वर्गाला समान वाटा देण्याचं काम हे आपल्या मोदी सरकारने केलं आहे." असंही अधिवेशनात अमित शाह म्हणाले.आप या पक्षावर टीका करताना अमित शाह म्हणाले, "आम आदमी पक्षाने मद्य घोटाळा, मोहल्ला क्लिनिक घोटाळा यांसारखे अनेक घोटाळे केले. लोकांच्या मेडिकल टेस्टचाही घोटाळा या पक्षाने केला. त्यामुळेच या पक्षाचे प्रमुख केंद्रीय तपासयंत्रणांपासून पळ काढत आहेत. आज आपण इंडिया आघाडीकडे पाहिलं तर ती घमंडिया आघाडी आहे हेच आपल्याला दिसतं.

# लग्नाच्या तीन वर्षानंतर वरुण धवन होणार बाबा

बॉलिवूडमधील लोकप्रिय अभिनेता म्हणून वरुण धवनला ओळखले जाते. अभिनयाबरोबरच वरुण त्याच्या खोडकर स्वभावामुळे नेहमी चर्चेत असतो. वरुणने आत्तापर्यंत अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे. सोशल मीडियावर तो मोठ्या प्रमाणात सक्रिय असतो. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करत तो चाहत्यांच्या संपर्कात असतो. वरुणच्या नव्या पोस्टने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. वरुण लवकरच बाबा होणार आहे. वरुणची पत्नी नताशा गरोदर असून लवकर त्यांच्या घरात चिमुकल्या पाहुण्याचे आगमन होणार आहे. वरुणने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत चाहत्यांना ही आनंदाची बातमी दिली आहे. वरुणने नताशा व त्याचा एक फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. फोटोमध्ये नताशा गरोदर असल्याचे दिसून येत आहे. तर वरुण तिच्या बेबी बंपचे चुंबन घेत आहे. हा फोटो शेअर करत त्याने लिहिले आम्ही प्रेग्नंट आहोत, आम्हाला तुमच्या प्रेमाची व आर्शिर्वादाची गरज आहे.” वरुणची ही पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. अनेक चाहत्यांनी या पोस्टवर कमेंट करत दोघांचे अभिनंदन केले आहे.२४ जानेवारी २०२१ ला वरुण व नताशाने





लग्नगाठ बांधली. केवळ ५० लोकांच्या उपस्थितीत हा लग्नसोहळा पार पडला अलिबागच्या द मॅन्शन रिसॉर्टमध्ये या लग्नाचे आयोजन करण्यात आले होते. या लग्नाचे फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते. वरुण व नताशा लहानपणापासूनचे मित्र-मैत्रिण आहेत. लग्नाअगोदर दोघेबऱ्याच वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये होते. वरुणने त्याच्या करिअरच्या सुरूवातीला नताशा आणि त्याच्या रिलेशनशिपबद्दल जगजाहीर केले नव्हते. मात्र दोघांना बऱ्याचवेळा एकत्र पाहिले गेले होते. आता लग्नाच्या तीन वर्षानंतर दोघे आई-बाबा होणार आहेत.वरुण धवनच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास, गेल्यावर्षी त्याचा बवाल चित्रपट प्रदर्शित झाला. यामध्ये त्याच्याबरोबर जान्हवी कपूरची प्रमुख भूमिका होती. मात्र बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट फ्लॉप ठरला. आता लवकरच वरुणचा ‘बेबी जॉन’ चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## ईशा देओल आता अभिनय सोडून राजकारणात येणार

सिनेसृष्टीतील दिग्गज जोडपं हेमा मालिनी व धर्मेंद्र यांनी मुलगी ईशा देओलचा घटस्फोट झाला आहे. ईशा व भरत तख्तानी ११ वर्षांच्या संसारानंतर विभक्त झाले आहेत. घटस्फोटानंतर आता ईशा राजकारणात येणार का, याबाबत हेमा मालिनींना विचारण्यात आलं. त्यावर त्यांनी काय उत्तर दिलं ते जाणून घेऊयात.हेमा मालिनी यांनी खुलासा केला की त्यांचे पती धर्मेंद्र यांनी त्यांना राजकारणात येण्यास पाठिंबा दिला. “माझे कुटुंब नेहमीच माझ्यासोबत राहिले आहे. त्यांच्यामुळेच मी हे करू शकले आहे. ते माझ्या मुंबईतील घराची काळजी घेत आहेत, त्यामुळे मी अगदी सहज मथुरेत येत आहे. त्यांच्या मुली ईशा आणि अहाना देओल यांना राजकारणात येण्याची इच्छा आहे का, असं विचारलं असता हेमा मालिनी म्हणाल्या, “त्यांना हवं असल्यास त्या राजकारणात येऊ शकतात.

## आयशाने दिलं चांगलंच उत्तर

बऱ्याच काळानंतर ‘वॉंटेड’ फेम अभिनेत्री आयशा टाकिया काही दिवसांपूर्वी मुंबई विमानतळावर दिसली होती. यादरम्यानचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. पण आयशाच्या लूकवरून लोकांनी तिला ट्रोल केलं. “प्लास्टिक सर्जरी करून हिने स्वतःचा चेहरा बिघडवला’, अशा आशयाच्या अनेक प्रतिक्रिया लोकांनी तिच्या व्हिडीओवर दिल्या होत्या. एवढंच नाहीतर लोकांनी तिला शरीर रचनेवरून ट्रोल केलं होतं. मात्र आता ट्रोलर्सला आयशाने चांगलंच उत्तर दिलं आहे.अभिनेत्री आयशा टाकियाने ट्रोल झाल्यानंतर सोशल मीडियावर भलीमोठी पोस्ट लिहिली आहे. आयशा म्हणाली, “मला हे सांगण्याची गरज आहे. दोन दिवसांपूर्वी माझ्या कुटुंबात मेडिकल इमरजेंसी असल्यामुळे गोव्याला निघाले होते. माझी बहीण हॉस्पिटलमध्ये आहे. यादरम्यान मला विमानतळावर काही पापाराझींना थांबवलं. त्यामुळे काही वेळात मी पापाराझींसाठी पोझ दिल्या. पण आपल्या देशात माझ्या लूकवर बोलण्याशिवाय इतर कोणतेही महत्त्वाचे मुद्दे नाहीत, असं मला वाटतं. अनेक जण बेताल मतं मांडत आहेत. मला कसं दिसायला पाहिजे होतं आणि कसं नाही याविषयी बोललं जात आहे. पण मला कुठलाही चित्रपट करण्यात किंवा पुन्हा कमबॅक करण्यात अजिबात रस नाही.



## जॉन सीनाला पडली शाहरुख खानची भूरळ

बॉलीवूडचा किंग शाहरुख खान नेहमी चर्चेत असतो. आपल्या अभिनयाच्या जोरावर शाहरुखने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. जगभरात शाहरुखचे लाखो चाहते आहेत. केवळ सामान्य लोकच नाही तर प्रसिद्ध सेलिब्रिटींनाही शाहरुखचे वेड लागले आहे. अनेक कलाकार किंग खानचे कौतुक करताना दिसतात. या यादीत एक नाव आहे WWE चॅम्पियन जॉन सीनाचे. जॉन अनेकवेळा शाहरुख खानची स्तुती करताना दिसला आहे. आता त्याने शाहरुखचे प्रसिद्ध गाणे गुणगुणले आहे, ज्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. शाहरुख खानचे स्टारडम भारतातच नाही तर परदेशातही बघायला मिळते. अनेक परदेशी कलाकार शाहरुखचे चाहते आहेत. यामध्ये WWE सुपरस्टार जॉन सीनाचाही समावेश आहे, नुकत्याच त्याच्या नव्या व्हिडिओने सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला आहे. व्हिडीओमध्ये जॉन ‘दिल तो पागल है’ मधील शाहरुख खानचे लोकप्रिय गाणे ‘भोली सी सूरत’ गाताना दिसत आहे. शाहरुख खानच्या एका फॅन पेजने हा व्हिडिओ इंस्टाग्रामवर शेअर केला आहे.व्हिडिओमध्ये आपण जॉन सीनाला शाहरुखवर चित्रित झालेले गाणे गाताना चाहते खूप खूश झाले आहेत. अनेकांनी या व्हिडीओवर मोठ्या प्रमाणात कमेंट केल्या आहे. ‘भोली सी सूरत’ हे गाणे १९९७ साली प्रदर्शित झालेल्या ‘दिल तो पागल है’ या चित्रपटातील गाजलेले गाणे आहे. उदित नारायण व लता मंगेशकर यांनी या गाण्याला आवाज दिला. हे गाणे रिलीज होऊन २७ वर्ष झाली तरी या गाण्याची क्रेझ कमी झालेली नाही. शाहरुखच्या वर्कफ्रंटबाबत बोलायचे झाल्यास, २०२३ वर्ष त्याच्यासाठी खूप खास ठरले. गेल्यावर्षी त्याचे तीन चित्रपट प्रदर्शित झाले. जवान, पठाण व डंकी. या तिन्ही चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली होती. आता शाहरुख खान पुढे KGF स्टार यशच्या ‘टॉक्सिक’ चित्रपटात कॅमिओ करताना दिसणार आहे. मात्र, याबाबत अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

## रश्मिका म्हणाली, “..मी मरता मरता वाचले

नॅशनल क्रश अशी ओळख असलेली रश्मिका मंदाना ही तिच्या ANIMAL या सिनेमामुळे चांगलीच चर्चेत आहे. तसंच त्याआधी ती पुष्पा सिनेमातल्या श्रीवल्लीच्या भूमिकेमुळे घराघरांत पोहचली. याच रश्मिकाचे चाहते देशभरात आहेत. तिचं नशीब बलवत्तर म्हणून ती मरता मरता वाचली आहे. रश्मिकानेच यासंदर्भातला फोटो पोस्ट केला आहे. काळ आला होता पण वेळ आली नव्हती असं म्हणत रश्मिकाने हा फोटो आणि व्हिडीओ पोस्ट केला आहे. रश्मिकाची ही पोस्ट पाहिल्यानंतर चाहत्यांनीही चिंता व्यक्त केली आहे. रश्मिकाने अभिनेत्री श्रद्धा दास बरोबर इंस्टाग्राम स्टोरीवर एक फोटो पोस्ट केला आहे. यामध्ये रश्मिका म्हणते तुमच्या सगळ्यांच्या माहितीसाठी सांगते आहे, अशा प्रकारे आज आम्ही मरता मरता वाचलो आहोत. या फोटोत रश्मिका आणि श्रद्धा दास यांचे फोटो दिसत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार रश्मिका, श्रद्धा दास आणि इतर प्रवासी जे या विमानातून प्रवास करत होते त्या विमानाचं इमर्जन्सी लँडिंग करण्यात आलं. तांत्रिक बिघाड झाल्याने हे लँडिंग करावं लागलं. हे विमान मुंबईहून हैदराबादला जात होतं. विमान हैदराबादच्या दिशेने निघालं होतं. पण तांत्रिक बिघाडामुळे या विमानाचं इमर्जन्सी लँडिंग करण्यात आलं. या फोटोमुळे रश्मिकाच्या चाहत्यांनाही धक्का बसला आहे.रश्मिका मंदाना ॲनिमल या सिनेमात झळकली होती. त्यामुळे ती प्रसिद्धीच्या झोतात पुन्हा एकदा आली होती. अभिनेता रणबीर कपूरने रणविजय हे पात्र साकारलं होतं. तर रश्मिकाने या सिनेमात गीतांजली हे पात्र साकारलं होतं. याच रश्मिकाने आपला अनुभव सोशल मीडियावर पोस्ट केला आहे.



# भारताची ‘यशस्वी’ कामगिरी!

## » इंग्लंडविरुद्ध तिसऱ्या कसोटीत 434 धावांनी विजय

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**सलामीवीर यशस्वी जैस्वालचे (२३६ चेंडूंत नाबाद २१४ धावा) द्विशतक आणि रवींद्र जडेजाच्या (४१ धावांत ५ बळी) प्रभावी माऱ्याच्या बळावर भारताने इंग्लंडला तिसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात रविवारी चौथ्या दिवशी ४३४ धावांनी नमवत कसोटीमधील आपला सर्वात मोठा विजय नोंदवला आणि पाच सामन्यांच्या मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली. इंग्लंडच्या ‘बॅझबॉल’ रणनीती भारतासमोर चालली नाही. ५५७ धावांच्या कठीण लक्ष्याचा पाठलाग करताना संघाला ३९.४ षटकांत १२२ धावाच करता आल्या. कुलदीप यादवने दोन तर, जसप्रीत बुमरा व रविचंद्रन अश्विन यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.**





भारताने यापूर्वी, न्यूझीलंविरुद्ध २०२१मध्ये ३७२ धावांनी विजय मिळवला होता. इंग्लंडविरुद्ध कोणत्याही संघाचा हा दुसरा सर्वात मोठा विजय आहे. विशाखापट्टणमच्या दुसऱ्या कसोटी सामन्यातज २०९ धावा करणाऱ्या जैस्वालने नाबाद २१४ धावांची खेळी केल्याने भारताने आपला डाव ४ बाद ४३० धावांवर घोषित केला. भारताने आपल्या पहिल्या डावात ४४५ धावा केल्या होत्या व त्यानंतर इंग्लंडला पहिल्या डावात ३१९ धावांवर रोखले. जैस्वालने आपल्या खेळीत १४ चौकार व १२ षटकार लगावले. जैस्वाल आणि पदार्पणवीर सर्फराज खानने (७२ चेंडूंत नाबाद ६८ धावा) पाचव्या गड्यासाठी १७२ धावांची अभेद्य भागीदारी रचली. आपला पहिला कसोटी सामना खेळणाऱ्या सर्फराजने सलग दुसरे अर्धशतक झळकावले. त्यामुळे शुभमन गिलने ९१ धावांची खेळी केली.इंग्लंडच्या डावाची सुरुवात चांगली झाली नाही. पहिल्या डावातील शतकवीर बेन डकेटच्या (४) रूपात संघाला पहिला धक्का बसला. बुमराने चहापानाच्या विश्रांतीपूर्वी झॅक क्रॉलीला (११) बाद करीत संघाला अडचणीत आणले. यानंतर जडेजा ने ओली पोपला (३) माघारी धाडले व पुढच्याच षटकात जॉनी बेअरस्टोला (४) बाद केले. त्यामुळे इंग्लंडची अवस्था ४ बाद २८ अशी बिकट झाली. इंग्लंड ५० धावांवर असताना जो रूट (७) व कर्णधार बेन स्टोक्स (१५) बाद झाल्याने इंग्लंडच्या अडचणी वाढल्या. कुलदीपने रेहान अहमदला (०) बाद करीत संघाची अवस्था ७ बाद ५० अशी बिकट केली. बेन फोक्स (१६) व टॉम हार्टली (१६) यांनी पुढील ११ षटके गडी बाद होऊ दिला नाही. यानंतर फॉक्सला जडेजा व हार्टलीला अश्विनने माघारी धाडले. मार्क वूडने (३३) आपल्या खेळीत सहा चौकार व एक षटकार लगावला. जडेजाने वूडला यशस्वी करवी झेलबाद करीत इंग्लंडचा डाव संपुष्टात आणला. त्यापूर्वी, जैस्वालने इंग्लंडच्या गोलंदाजांना धारेवर धरले. जैस्वालने ४१ वर्षीय वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसनच्या एकाच षटकात तीन षटकार लगावले. जैस्वाल व सर्फराज यांनी आक्रमक फलंदाजी करताना दुसऱ्या सत्रातील १६ षटकांत ११६ धावा जोडल्या. सर्फराजने आपल्या खेळीत सहा चौकार व तीन षटकार झळकावले. भारताने चौथ्या दिवशी २ बाद १९६ धावसंख्येच्या पुढे खेळण्या सुरुवात केली. गिल व कुलदीप यादव (२७) यांनी एक तास इंग्लंडला यश मिळू दिले नाही व चौथ्या गड्यासाठी ५५ धावांची भागीदारी केली. गिलला धावचीत झाल्याने ही भागीदारी मोडीत निघाली.भारताचा तारांकित ऑफ-स्पिनर रविचंद्रन अश्विनने इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या चौथ्या दिवशी चहापानानंतर मैदानात उतरला.

### मालिकेत 2-1 अशी आघाडी

» अश्विन सामन्याच्या दुसऱ्या दिवशी ५०० गडी बाद केल्यानंतर काही काळ आपली आई आजारी असल्याने तिसरा कसोटी सामना मध्येच सोडून गेला होता. त्यापूर्वी, अश्विन संघासोबत येईल हे ‘बीसीसीआय’ने पहिल्या सत्रातच सांगितले होते.सलामीवीर यशस्वी जैस्वालचे (२३६ चेंडूंत नाबाद २१४ धावा) द्विशतक आणि रवींद्र जडेजाच्या (४१ धावांत ५ बळी) प्रभावी माऱ्याच्या बळावर भारताने इंग्लंडला तिसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात रविवारी चौथ्या दिवशी ४३४ धावांनी नमवत कसोटीमधील आपला सर्वात मोठा विजय नोंदवला आणि पाच सामन्यांच्या मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली.

# अंतिम लढतीत थायलंडवर मात, अनमोलचा निर्णायक विजय

## » महिला संघाने आशियाई स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवले

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय बॅडमिंटनचा ताजातवाना चेहरा म्हणून पसंती मिळत असलेल्या १७ वर्षीय अनमोल खरबच्या आणखी एका निर्णायक विजयाने भारतीय महिला संघाने रविवारी आशियाई सांघिक अजिंक्यपद स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवले. भारताने थायलंडचा ३-२ असा पराभव केला. युवा खेळाडूंचे नेतृत्व करताना पी. व्ही. सिंधूच्या नव्या भारतीय संघाने थायलंडच्या साऱ्या अपेक्षा फोल ठरवल्या.**



दोन वेळच्या कांस्यपदक विजेत्या थायलंड संघाला भारताच्या युवा गुणवत्तेला आव्हान देता आले नाही.या विजयाने भारतीय महिला संघ उबेर चषकासाठी देखील पात्र ठरला. भारतीय महिला संघाचे हे पहिलेच पदक ठरले. यापूर्वी या स्पर्धेत २०१६ आणि २०२० मध्ये भारतीय पुरुष संघ कांस्यपदकाचा मानकरी ठरला होता. टाचेच्या दुखापतीतून पूर्ण बरे होण्यासाठी आवश्यक वेळ घेतल्याचे सिंधूने आपल्या कामगिरीने दाखवून दिले. गेल्या हंगामातील अपयशही सिंधूने खोडून काढले. सिंधूने जागतिक क्रमवारीत १७व्या स्थानावर असलेल्या सुपानिदा काटेथाँगचा २१-१२, २१-१२ असा फडशा पाडून भारताला विजयी सुरुवात करून दिली. पाठोपाठ ट्रीसा जॉली-गायत्री गोपीचंद या युवा जोडीने आपली कामगिरी उंचावताना जागतिक क्रमवारीत १०व्या स्थानावर असणाऱ्या जोंगकोल्फान किटिथाराकुल- रिवडा प्रा जोंगजई जोडीचे आव्हान २१-१६, १८-२१, २१-१६ असे संघर्षपूर्ण लढतीत परतवून लावले.दुसऱ्या एकेरीत अश्मिता चलिहाला मात्र, बुसानन ओंगबाम्रुंगफानचे आव्हान परतवून लावता आले नाही. बुसाननने ११-२१, १४-२१ असा विजय मिळविला. दुहेरीत भारताने युवा श्रुती मिश्रा-प्रिया कोंजेंगबाम जोडीला उतरवले. पण, त्यांना बेनयापा एमसार्ड-नुन्ताकार्न एमसार्ड जोडीकडून ११-२१, ९-२१ असा पराभव पत्करावा लागला.

### संघ उबेर चषकासाठी देखील पात्र

» अनमोलने निर्णायक एकेरीच्या लढतीत थायलंडच्या पॉर्नपिचा चोएकीवोंगचे आव्हान अगदी सहजपणे २१-१४, २१-९ असे परतवून लावले. भारतीय बॅडमिंटनचा ताजातवाना चेहरा म्हणून पसंती मिळत असलेल्या १७ वर्षीय अनमोल खरबच्या आणखी एका निर्णायक विजयाने भारतीय महिला संघाने रविवारी आशियाई सांघिक अजिंक्यपद स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवले. भारताने थायलंडचा ३-२ असा पराभव केला. युवा खेळाडूंचे नेतृत्व करताना पी. व्ही. सिंधूच्या नव्या भारतीय संघाने थायलंडच्या साऱ्या अपेक्षा फोल ठरवल्या. दोन वेळच्या कांस्यपदक विजेत्या थायलंड संघाला भारताच्या युवा गुणवत्तेला आव्हान देता आले नाही.या विजयाने भारतीय महिला संघ उबेर चषकासाठी देखील पात्र ठरला.